# मराठवाड्यातील पर्यटनउद्योगाचा विकास व सद्य : स्थिती

**प्रा. गायकवाड प्रेमचंद गुंडू**
**रयत शिक्षणसंस्थेचे, कला व वाणिज्य महाविद्यालय माढा. ता.माढा जि. सोलापूर.**



**प्रस्तावना:-**

पर्यटन म्हणजे प्रवास इंग्रजी भाषेतील टुरिझम या संज्ञेचा हा पर्याय आहे. इंग्रजी भाषेतील टुरिझम म्हणजे पर्यटक ही संज्ञा (ट्रव्हलर ) प्रवासी या शब्दाऐवजी एकोणीसाव्या शतकारंभी वापरण्यात येऊ लागली. आधुनिक काळात पर्यटन हा एक स्वतंत्र राष्ट्रीय उद्योग म्हणुन विकसित झाल्याचे दिसुन येते. देशातील व परदेशातील पुरावास्तु, इतिहासप्रसिध्द व निसर्गरम्य स्थळे, प्राचिन कलानिर्मितीची केंद्र पवित्रतिर्थक्षेत्रे प्रचंड औद्योगिक व इतर प्रकल्प इत्यादिंचे आकर्षण ही पर्यटनामागिल मुळ प्रेरणा होय. ही प्रेरणा सार्वत्रिक व सर्वकालीन असली तरी आधुनिक काळातील ज्ञानप्रसाराची व दळणवळणाची सुलभ साधने विकसित झाल्याने आधुनिक पर्यटन उद्योगास चालना मिळाली. निसर्गनिर्मित व मानवनिर्मित रम्य व भव्य असे जे इहलोकीचे जे सौंदर्य आहे त्याविषयीची खास आस्था हा आधुनिक माणसाचा धर्म आहे. आनंदासाठी प्रवास करणे म्हणजे पर्यटन असाही अर्थ घेतला जातो. जागतिक पर्यटन संघटनने पर्यटक या शब्दाची व्याख्या पुढील प्रकारे केली “जे लोक आर्थिक कमाई न करता केवळ आनंदासाठी विशिष्ठ प्रदेशात २४ तासांपेक्षा जास्त व एक वर्षापेक्षा कमी काळ घराबाहेर राहुन प्रवास करतात ते पर्यटक होत” पर्यटनामागिल आधुनिक माणसाची प्रेरणा वरील भुमिकेचा निर्वाळा देते. आधुनिक काळातील पर्यटकांच्या वर्गात विविध उद्देशांनी प्रवास करणाऱ्यांचा अंतर्भाव होतो. मुख्यतः पर्यटन काळ हा मर्यादित असतो. आठवड्यातील सुट्या रजा तसेच एकाद्या कार्याचा वा कार्यक्रमाचा भाग म्हणुन नियोजित काळात पर्यटन केले जाते. पर्यटक हे उत्प्रवासी व आप्रवासी आणि स्थलांतर करणारे मजूर यांपेक्षा वेगळे असतात. आधुनिक अर्थशास्त्रिय परिभाषेत पर्यटक हा सामान्यतः ग्राहक वा उपभोक्ता समजला जातो तो उप्तादक नसतो. पर्यटनाचे क्षेत्र आंतरर्देशिय तसेच आंतरराष्ट्रीय असते जुन्या पर्यटन स्थळांची व्यवस्था राखणे व नविन पर्यटन स्थळे विकसित करणे ही पर्यटन उद्योगाची महत्वाची अंगे होत. आधुनिकपूर्व काळात पर्यटनाची उदिष्टे प्राधान्याने धार्मिक व्यापारी व विद्याध्यनात्मक असत.

**पर्यटनाचा आर्थिक दृष्टीकोन :** या दृष्टीकोनातुन पर्यटन उद्योग महत्वाचा ठरतो पर्यटन उद्यागामुळे सेवा उद्योगांना महत्वपुर्ण स्थान प्राप्त झाले. वस्तुचे उत्पादन वितरण सेवन हेच दिर्घकाळ आर्थिक विश्लेषणाचे प्रमुख चर्चाविषय होते. पर्यटनामूळे व्यापाराचे प्रमाण व परिणाम याचा विस्तार झाला. पर्यटनामूळे जो प्रत्यक्ष पैसा मिळतो त्याहीपेक्षा राष्ट्रीय उत्पन्नामध्ये गुणक परिणामामुळे जी भर पडते किंवा पर्यटक खर्चाच्या उलाढालीमुळे जी भर पडते तिचे महत्व अधिक असते.

**सांस्कृतिक दृष्टीकोन:** आर्थिक लाभाखेरिज पर्यटनाच्या योगे विविध देशांतील भिन्नभिन्न लोक एकत्र येउुन व एकमेकांना अधिक चांगल्या प्रकारे जाणुन घेउु शकतात. तणावांनी भरलेल्या सध्याच्या जगामध्ये आंतरराष्ट्रीय सदिच्छा व सामंजस्य यांचे वर्धन करण्याच्या कामी आंतरराष्ट्रीय पर्यटनाचा बहुमोल उपयोग होतो. देशांतर्गत पर्यटनासही ही गोष्ट लागू पडते भाषा आणि चालिरिती यांचे वैविध्य असलेल्या भारतासारख्या खंडप्राय देशात पर्यटन हे राष्ट्रीय एकात्मता साधण्याचे प्रभावी साधन होय.

**आंतरराष्ट्री य पर्यटन उद्योग :** १८११ साली सुरु झालेला हा आंतरराष्ट्रीय पर्यटन उद्योग १९५० नंतरच्या काळात वेगाने विकसित झाला १९७३ पर्यंत ३७०० काटी व नंतर आज पर्यंत यात गुंतवणुक सतत वाढत गेली असुन असे पर्यटनविषयक संस्थांचा उदय झाला उलाढालीच्या संदर्भात तेल उद्योगानंतर दुसरा तरीही सबंध जगामध्ये सर्वात जास्त रोजगार उपलब्ध करुन देणारा उद्योग म्हणून त्याचा पहिला क्रमांक चुकलेला नाही. स्विझरलँड हा देश पर्यटनाच्या बाबतीत जगात प्रसिध्द आहे. तर चीन ची विशाल भिंत हे जागतिक पातळीवरील पर्यटकांचे एक आकर्षण आहे.

**भारतातील पर्यटन :**

भारतात १९६० च्या सुमारास पर्यटन उद्योगास विषेश चालना मिळाली. भारतात यात्रा व सहली यांच्या विकासाला चालना देणार ८ मोटारगाड्यांमुळे उत्पन्न प्राप्ती यामधे झालेली वाढ २) वर्षामधे तीन आठवडे वा अधिक रजेची सवलत ३) देशातील नवनिवन प्रकल्पाविषयी वाटाणारे आकर्षण ४) चांगले रस्ते व गतीमान प्रवास सुविधा. भारतातील नैसर्गिक व वास्तुकलाविषयक व ऐतिहासिक साधन संपत्तीचे इतके वैविध्य आहे की ते विदेशी पर्यटकांना आकर्षित करुन घेतात. २०११ च्या तुलनेत २०१२ च्या परकीय चलनाच्या प्राप्ती ७७५९१ कोटी रु वरुन ९४४८७ कोटी इतकी म्हणजे २१ टक्के वाढ झाली यावरुन भारतीय पर्यटनाच्या स्थितीची कल्पना येते.

**महाराष्ट्र पर्यटन :** प्रस्तुत शेधनिबंध मराठावाडा या महाराष्ट्रातील एका प्रादेशिक व प्रशासकीय विभागाशी संबंधिकत आहे हा प्रदेश महाराष्ट्र राज्याचा क भाग असल्याने महाराष्ट्राच्या पर्यटन उद्योगा विषयी उहापोह करणे उचित ठरते पर्यटन विकासामध्ये महाराष्ट्र मागे नाही. विदेशी पर्यटकांना मानवी स्वभावानुसार भेट दिलेल्या स्थानाची स्मृती आपल्याजवळ रहावी असहे वाटणे साहजिक आहे ही बाब लक्षात घेउुनच महाराष्ट्र राज्याने पर्यटन स्मरणिका निर्माण करण्याचा मान प्रथम पटकविला.

मुंबई, पेणे, कोल्हापुर, नागपुर, सोलापुर ही औद्योगिक तसेच सांस्कृतीक कला केंद्र अजिंठा वेरुळ ही विश्वविख्यात लेण्यांची पर्यटन केंद्रे चैत्य शिल्पांसाठी प्रसिद्ध असलेली कार्ले भाजे ही स्थाने अर्नाळा ताडोबा सारखी उद्याने कील्ले हे शौर्याची व अस्मितेची जाणिव करुन देतात कोयना जायकवाडी राधानगरी सारखे प्रकल्प

थंड हवेची ठिकाणे पंढरपुर जेजुरी पाली सारखी लाखोंनी भरणारी यात्रेची ठिकाणे या सर्वाच्या रुपाने महाराष्ट्र राज्य अंतर्गत व आंतरराष्ट्रीय पर्यटकांना आकर्षित करित आहे.

**राज्याचे पर्यटन विषयक धोरण :** महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या रुपाने काळाचे आव्हान स्विकारले असुन एक प्रमुख पर्यटन राज्य म्हणून मान्यता पावले आहे. १९९३ च्या राज्याच्या पर्यटन धोरणाच्या माध्यमातुन रोजगारभिमुख व परकीय चलन मिळवुन देणारा उद्योग असे महत्व ओळखले आहे. राज्याच्या पर्यटन धारेणाची उदिष्टे पुढील प्रमाणे आहेत १)स्थानिक तज्ञ सहभागाद्वारे पर्यटन नियोजन २) पर्यटकांना आकृष्ट करण्यासाठीच्या माहितीचे प्रसारण ३) सध्याच्या पर्यटन सोयीचे आद्ययावतता करणे ४) तरुण व मध्यम उत्पन्न गटांसाठी पर्यटन सुविधा निर्माण करणे ५) नागरी औद्योगिक क्षेत्रात मनोरंजनाच्या सुविधा वाढविणे ६) पर्यावरणाचा तोल न ढासळता नैसर्गिक व सांस्कृतिक संसाधनाचे एकात्मिक विकास पध्दतिने संवर्धन करणे ७) स्थानिय हस्तकला वकारगिरी यांना उत्तेजन देण . ही उद्दिष्टे महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाच्या माध्यमातुन प्रत्यक्षात साकार करावयाची आहेत.

महाराष्ट्र राज्याच्या १९९३ च्या पर्यटन धोरणात पर्यटन विकासाच्या अनेक योजना आहेत. त्यात मेगा प्रोजेक्ट मानव संसाधन विकास पर्यटकांच्या तक्रार निवारणार्थ कंद्रे पर्यावरण संवर्धन संस्कृती संवर्धन
लोकसहभाग माहिती व प्रसिध्दि पर्यटन मागदर्शन पायाभुत सुविधांचा विकास जमिन विषयक धाोरण इ. चा समोवेश आहे.

मेगा प्रोजेक्ट अंतर्गत पश्चिम प्रादेशिक किंवा कोकण पर्यटन क्षेत्र विकास कार्यक्रमाचा समावेश आहे. त्याचप्रमाणे या योजनेत विदर्भ व मराठवाडा क्षेत्रातील पर्यटन स्थळांच्या विकासाच्या योजना आहेत.

मराठवाड्या संबंधीचा सविस्तर उहापोह पुढील विभागात करण्यात आला आहे.

| | | |
|---|---|---|
| १ | पर्वतिय थंड हवेची पर्यटन स्थळे | माथेरान, लोनावळा, खंडाळा, महाबळेश्वर, पांचगणी, महिममाळ, जव्हार, अंबोली, चिखलदरा, पन्हाळा, रामटेक सातारा, तोरणमाळ, माळशेज घाट |
| २ | समुद्र किनारे | आलिबाग, मारवे, वोर्डि, रेवस, कीहिम, अंबोळगड, डहाणु, देवगड, एरगळ, गणपती पुळे, मुरुड जंजिरा , मंडवा, मढ, गोराई, नागव, वेलीनेश्वर, वेंगुर्ला इ. |
| ३ | उष्ण पाण्ययाचे झरे | अकोली, अदाबद, चांगदेव, सालवर्डी, स्तवल साव, उनपदेव, वजेश्वरी |
| ४ | तळे सरोवरे | अंबर, अंधरा, वेअळे भंदरा, कीनसे तलाव, खडकवामला, मूळशी तानमा, लोनार पवई |
| ५ | राष्ट्रीय उदद्वयाने अभयारण्ये | बोरीवली, मेळघाट, भंडारदरा, किनवट, पेंच, ताडोवा, कर्नाळ, भिमाशंकर |
| ६ | धार्मिक यात्रेची ठिकाणे | त्रिंबकेश्वर, पैठण, शेगाव, तुळजापुर, पंढरपूर, शिर्डी, भिमाशंकर, हरिहरेश्वर, नांदेड अष्टविनयक. |
| ७ | ऐतिहासिक प्रेक्षणिय स्थळे | |
| | अ किल्ले | अहमदनगर बासिन देवगिरी, दैलताबाद, गाबिलगड, मुरुड जंजिरा, प्रतापगड, पुरंदर , रायगड, सिंधुदुर्ग, सिंहगड, शिवनेरी, विजयदुर्ग, तोरणा, |
| | ब लेणी | अजिंठा, वेरुळ, औरंगाबाद, वेडसा, भाजे, फर्दापुर कान्हेरी, कोंडाणा, कार्ले, खरोसा, कुडा, पतिळखोरे, पांडवलेणी इ. |

विषेश पर्यटन क्षेत्रे :या विषेश पर्यटन क्षेत्रांमधे विषेश योजना जाहिर करण्यात आल्या आहेत. यात विषेश योजनेअंतर्गत आर्थिक दृष्टया मागास जिल्ह्यांतील एकुण ३६ पैकी ९ जिल्ह्यांत पर्यटनाद्वारे समतोल. प्रादेशिक विकास साधण्याचा प्रयत्न केला आहे. पुढील तक्ता क्र. २ मध्ये महाराष्ट्र शासनाने ९ कमी विकसित जिल्ह्यांतील जे तालुके विषेश पर्यटन क्षेत्र योजनेत निवडले आहेत ते दाखतिले आहे.

**तक्ता क्र. २ महाराष्ट्र शासनाने निवडलेले विषेश पर्यटन क्षेत्रातील तालुके**

| अनु क्र . | जिल्हा | विषेश पर्यटन क्षेत्रांतर्गत तालुके |
|---|---|---|
| १ | रत्नागिरी | राजापुर, रत्नागिरी, गुहागर, दापोली, मदनगड |
| २ | सिंधुदुर्ग | वेंगुर्ला, मालवण, देवगड |
| ३ | रायगड | अलिबाग, मुरुड, श्रीवर्धन,उरण |
| ४ | ठाणे | डहाणु, पालघर, बासिन ठाणे |
| ५ | औरंगाबाद | औरंगाबाद, खुलताबाद, सोयगांव |
| ६ | अमरावती | चिखलदरा |
| ७ | नागपुर | रामटेक |
| ८ | कोल्हापुर | पन्हाळा |
| ९ | पुणे | मावळ, मुळशी, भोर, वेल्हा, खेड, हवेली |

स्त्रोत :

**मराठवाड्यातील पर्यटन विकास :**

मराठवाडा म्हणजे विद्यमान महाराष्ट्र राज्यातील एक प्रादेशिक विभाग आहे. या विभागाच्या भौगोकि सिमा निश्चित नसुन निरनिराळया कालखंडात त्या बदलत गेल्या आहेत तसेच यातील उपविभागांची नावे ही बदलत गेली आहेत. पुर्वी मराठवाडयाचे पाच जिल्हे होत १९८२ पासुन जालना व लातुर या जिल्हयांचा समावेश झाला सद्यः हिंगोली चा समोवश झाल्याने या विभागात एकुण आठ जिल्हे आहेत. वरील कारणास्तव या विभागाचे क्षेत्रफळ व लोकसंख्या वेळोवेळी बदलत

गेली आहे. भारताच्या स्वातंत्र्यापुर्वी मराठवाडयातील सर्व जिल्हे हैद्राबाद संस्थानचा भाग होते. हैद्राबाद संस्थान हे भाषिक मुंबई राज्यात समाविष्ठ करण्यात आले. त्यानंतर १ मे १९६० रोजी महाराष्ट्र राज्याची स्थापना झाल्यावर मराठवाडा हा आपोआप महाराष्ट्र राज्याचा एक प्रशासकीय विभाग बनला मराठवाडयाच्या उत्तरेस माहराष्ट्र राज्याचे जळगाव व बुलढाणा हे दोन जिल्हे आणि पश्चिमेला नाशीक व अहमदनगर जिल्हे येतात. दक्षिणकडे सोलापुर आणि कर्नाटक राज्यातील गुलबर्गा व बीदर हे जिल्हे आहेत. पुर्वेला आंध्र प्रदेश राज्यातील कामारेड्डी निजामाबाद व आदीलाबाद तसेच महाराष्ट्रातील ययवतमाळ व आकोला हे जिल्हे आहेत.

मराठवाडा हा विभाग प्रशासकीय कारणासाठी बनलेला विभाग असुन पुर्वी यात ५ नंतर सात व सद्या औरंगाबाद जालना बीड परभणी नांदेड लातुर उस्मनाबाद व हिंगोली या आठ जिल्हयांचा समावेश आहे. पर्यटनाच्या दृष्टीने जागाच्या नकाशावर स्थानपावलेला आहे. याचे महत्वाचे कारण म्हणजे जगप्रसिद्ध पर्यटन स्थळे म्हणून मान्यता पावलेले अंजिठा व वेरुळ लेणी या विभागातील औरंगाबाद जिल्हयात आहेत.

नैसर्गिक व सांस्कृतिक या दोन प्रकारच्या पर्यटनापैकी सांस्कृतिक पर्यटनाच्या दृष्टीने मराठवाडा जास्त समृध्द आहे. त्याची ठळक वैशिष्ठे पुढील प्रमाणे.

१) शिव ज्योतिलिंगामध्ये महाराष्ट्रातील पाच पैकी घृष्णेश्वर वैजीनाथ व नागनाथ ही ज्योतिलिंगे अनुक्रमे वेरुळ परळी व औंढा येथे आहेत.

२) देवीच्या महाराष्ट्रातील साडेतीन शक्तीपीठापैकी दोन प्रमुख पीठे तुळजाभवानी व रेणुका अनुक्रमे उस्मानाबाद व नांदेड जिल्हयात आहेत.

३) मराठवाडयात महाराष्ट्रातील जास्तीत जास्त संताची जन्म स्थळे व समाधी स्थळे मराठवाडयात आहेत. या कारणास्तव स्थानिक पर्यटकांचा ओघ वर्षभर मराठवाडयात असतो.

४) जगप्रसिध्द लेणी या विभागातील औरंगाबाद जिल्हयात आहेत या कारणास्तव आंतरराष्ट्रीय पर्यटकांचा ओघ मराठवाडयात असतो.

या व्यतिरिक्त पर्यटनाचे पुर्वापार चालतआलेले प्रकार मराठवाडयात दिसुन येतात. आधुनिक काळात निर्माण झालेले ईको टुरिझम, कृषि पर्यटन, शैक्षणिक पर्यटन प्रकार मराठवाडयात दिसुन येत नाही.

राज्याच्या पर्यटण धोरणात मराठ्वाडया संबंधी तरतुदी : विषेश पर्यटन क्षेत्र या योजनेत मराठवाडयातील औरंगाबाद जिल्हयातील तीन तालुके औरंगाबाद खुलताबाद व सोयगांव यांचा समावेश करण्यात आला आहे. सह्याद्री पर्वत रांगेत खिस्तपुर्व २ या व ७ व्या शतका दरम्यान खडकात कोरलेली बौध्दधर्माच्या महायान पंथा संबंधित लेणी आंतरराष्ट्रीय पर्यटकांचे आकर्षण आहे. १९९५ साली मुंबई शहराला भेट देणाऱ्या ७ लाख परदेशी पर्यटकापैकी ७०००० पर्यटक ही लेणी पाहण्यासाठी आले होते. जपान मधिल ओव्हरसिज इकॉनॉमिक कापोरेशन फंड या कंपनीच्या वित्तिय सहाय्या द्वारे या पर्यटन क्षेत्राच्या विकासाची योजना प्रगतीपथावर आहे. यातील पहिल्या टप्यातील २०० कोटी रु. चे अर्थसहाय्य प्राप्त झाले आहे. पुढील तक्त्याद्वारे राज्यातील पर्यटन स्थळांच्या तुलनेत मराठवाड्यातील पर्यटन स्थळांची माहिती कळते.

| अ.क्र. | पर्यटन स्थळे | राज्यातील संख्या | मराठवाडयातील संख्या |
|---|---|---|---|
| १ | लेणी | १५ | ७ |
| २ | किल्ले | २४ | ३ |
| ३ | अभयारण्ये | २१ | १ |
| ४ | उद्याने | ५ | ० |
| ५ | थंड हवेची ठिकाणे | १२ | ० |
| ६ | धार्मिक स्थळे | २४ | ७ |
| ७ | ज्योतिर्लिंग | ५ | ७ |
| ८ | शक्तीपीठे | साडेतीन | २ |

या शोधनिबंधाच्या शोधकार्यात प्राप्त झालेल्या अन्य सांख्यिकी माहिती द्वारे मराठवाडयाच्या पर्यटनासंबंधी काही पैलु पुढे दिले आहेत.

**तक्ता क्र. ३ मराठवाडयातील पर्यटन स्थळ विकासाबाबत माहिती २०१३-१४**

| अ.क्र. | जिल्हा | वर्गवारी | संख्या | विकास कामे | खर्च (लाख) रु | पर्यटक | ट्रॅव्हल एजंट |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | जालना | क | ४६ | ४२ | ३७१.५८ | - | - |
| २ | उस्मानाबाद | क | २४ | २४ | ३६५.९५ | - | - |
| ३ | बीड | क | ५० | ६ | २६८.२ | - | - |
| ४ | औरंगाबाद | क | ४७ | ४७ | २७०.१४ | २९६५ | १५२ |
| ५ | लातुर | क | १० | १० | १४९.०७ | - | - |
| ६ | नांदेड | क | ११० | ४१ | ६१०.५६ | - | - |
| ७ | परभणी | क | १९ | ६ | १७३.२६ | - | - |
| ८ | हिंगोली | ब | २ | - | - | - | - |

स्त्रोत : जिल्हा सामाजिक आर्थिक व सांख्यिकी समालोचन-मराठवाडयातील सर्व जिल्हे.
वरील तक्त्यात रिक्त असलेल्या रकान्यासंबांधी राज्याच्या सांख्यिकी विभागाकडे माहिती उपलब्ध नाही.

मराठवाडयासबंधी इतर निर्देशांक उदा. रस्त्यांची गुणवत्ता, लांबी, पाण्याची उपलब्धता, हॉटेल्स, ट्रॅव्हल एजंटची संख्या इ. सोयी तसेच पर्यटन उद्योगासाठी लागणाऱ्या पायाभुत सुविधा राज्याच्या उर्वरित भागांपेक्षा तुलनात्मक दृष्टीने कमी प्रमाणात आहेत या करणास्तव मराठवाडयात फक्त स्थानिक पर्यटक सांस्कृतिक कारणास्तव मोठया प्रमाणावर आकृष्ट होतात. याउलट आंतरराष्टीय पर्यटक मराठवाडयातील आंतरराष्ट्रीय महत्व प्राप्त लेणी या स्थळांना मोठया प्रमाणावर भेटी देतात.

**अनुमान व निष्कर्ष** : मराठवाडा पर्यटनाच्या दृष्टीने राज्याच्या इतर भागांप्रमाणे संपन्न आहे. मराठवाडयात लेणी जास्त व प्रसिध्द आहेत सांस्कृतिक पर्यटनाच्या दृष्टीने राज्याच्या इतर भागांपेक्षा सरस आहे. मराठवाडयात राज्याच्या पर्यटन धोरणाची अंमलबजावणी पुरेशी झालेली नाही. पायाभुत सुविधा पुरेशा प्रमाणात उपलब्ध झाल्यास मराठवाडयात पर्यटनास अधिक वाव आहे.

## REFERENCES :


01) Maharastra. Economics and Statistics Directorate of - Socio-economic review and statistical abstract : jalana district, 2013-14 172p

1) Maharastra.. Economics and Statistics Directorate of - Socio-economic review and abstract : Osmanabad district. 2013-14 163 p
2) Maharastra. Economics and Statistics Directorate of- Socio-economic review and statistical abstract: Beed district, 2013-14 232 p
3) Maharastra. Economics and Statistics Directorate of- Socio-economic review and statistical abstract: Aurangabad district, 2013-14, 157p
4) Maharastra. Economics and Statistics Directorate of- Socio-economic review and statistical abstract: Latur district, 2013-14 167p.
5) Maharastra. Economics and Statistics Directorate of- Socio-economic review and statistical abstract: Nanded district, 2013-14 265 p.
6) Maharastra. Economics and Statistics Directorate of- Socio-economic review and statistical abstract: Parbhani district, 2013-14 184 p.
7) Maharastra. Economics and Statistics Directorate of- Socio-economic review and statistical abstract: Hingoli district, 2013-14 276 p.
8) India. Ministry of Tourism. Annual report, २०१२-१३ New Delhi : The Ministry, 2013. 112 p.
9) Maharastra. Planninig Department. Economic survey of Maharashrta, 2013-14 Mumbai : Planning Department, 2014. 237 p.
10) India. Minisftry of Tourism and Civil Aviation. Tourism progress report. New Delhi : the Ministry, 1973 19 p.
11) Gadre, V.R. Paryatan. Samavisshtha. Marathi Vishwakosh. Khand. 9 Mumbai : Marathi Vishwakosh Madal, 1976. Pp 275
12) Deglurkar, G.B. Marathwada. Samavishtha. Marathi Vishwakosh. Khand. 12 Mumbai : Marathi Vishwakosh Madal, 1976. Pp 1173.
13) Jadhav, Tukaram. Ed. Maharastra. : Varshiki, 2015 Pune : Unique Academy. 2016. 957 p.
14) Joshi, C.B. and Arunachalam, B. Maharashtra : Regional study. Bombay : A.R. South and Company, 1962. 187 p.